Anusandhanvallari
Vol 2024, No.1
December 2024
ISSN 2229-3388

# शहरी भागातील कंत्राटी कामगारांचे शोषणः कारणे आणि परिणाम

[1]कांचन किशोर बोळे, [2]बिना मधूकर मुन

[1]एम.कॉम.,बी.ऐड., सेट, डॉ.आंबेडकर कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,चंद्रपूर

rahul.kukare@gmail.com

[2]एम.कॉम. सेट, पी.एच.डी., एम.बी.ए., डी.बी.एम., डॉ.आंबेडकर कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,चंद्रपूर

binasnikam@gmail.com

**सारांश:** शहरी भागातील कंत्राटी कामगार हे आधुनिक औद्योगिक व सेवा क्षेत्राचा एक महत्वाचा घटक आहेत. मात्र या कामगारांचे कामाचे तास,वेतन,सामाजिक सुरक्षा व कामाच्या अटी यामध्ये मोठ्या प्रमाणावर अन्याय व शोषण आढळते. कंत्राटी पध्दतीमुळे स्थिर नोकरीची हमी नसल्याने हे कामगार नेहमी असुरक्षित स्थितीत राहतात. शहरी जिवनमान उच्च खर्चिक असल्याने त्यांच्या उत्पन्नावर सतत ताण पडतो. यामुळे त्यांच्या आरोग्यावर, कुटुंबाच्या जीवनमानावर आणि सामाजिक प्रगतीवर नकारात्मक परिणाम होतो.

**मुख्यशब्दः** कंत्राटी कामगार, शोषण, सामाजिक सुरक्षा, वेतन, कामगार हक्क.

**प्रस्तावनाः**

भारतीय समाज झपाटयाने बदलत आहे. जागतिकीकरण उदारीकरण आणि खासगीकरणामुळे उद्योगधंद्याचे स्वरूपही पूर्णपणे बदलत आहे. ग्रामीण भागातील लोक मोठ्या प्रमाणावर शहराकडे स्थंलातर करत आहेत. रोजगाराच्या शोधात आलेले हे लोक बांधकाम, रस्ते, मॉल्स, कारखाने, हॉटेल्स, हॉस्पिटल्स, सफाई सेवा, सुरक्षा सेवा अशा क्षेत्रात काम करतात. यामधील एक मोठा वर्ग म्हणजे कंत्राटी कामगार.कंत्राटी कामगार हे थेट संस्थेकडे नियुक्त नसतात ते एखाद्या ठेकेदारामार्फत कामावर घेतले जातात. त्यामुळे त्यांची नोकरी अस्थिर असते, त्यांना हक्काची नोकरी मिळत नाही. त्यांना कामावरुन कधीही कमी करता येते. वेतन कमी असते,

Anusandhanvallari
Vol 2024, No.1
December 2024
ISSN 2229-3388

पगार वेळेवर मिळत नाही, शहरी भागातील आलिशान इमारती, स्वच्छ रस्ते, मोठमोठे प्रकल्प यामागे ह्याच कंत्राटी कामगारांचे श्रम दडलेले असतात, परंतु त्यांचे जीवनमान मात्र दीनवाणे आहे. शहरी भागातील कंत्राटी कामगारांना अनेक प्रकारचे शोषण सहन करावे लागते. मजुरी कमी मिळणे,ज्यादा वेळ काम करुनही अतिरिक्त मोबदला न मिळणे, सुट्टयांचा अभाव, आरोग्यविमा व सुरक्षिततेची साधने नसणे, अशा अनेक समस्या त्यांना भेडसावतात. महिला कामगारांना तर दुहेरी शोषणाला सामोरे जावे लागते. एका बाजूला कमी वेतन, असुरक्षित कामाचे वातावरण आणि दुस-या बाजूला लिंगभेद व छळवाद.

शहरी भागात अनेक नविन रोजगाराच्या संधी असल्या तरी, त्या सर्व कामामध्ये सुरक्षितता आणि स्थैर्य नाही. शहरातील बहुसंख्य कामगार हे कंत्राटी पधदतीने काम करणारे असतात. हे कंत्राटी कामगार उद्योग बांधकाम स्वच्छता हॉस्पिटल, कार्यालय, मॉल्स आणि सेवांक्षेत्रात कार्यरत असतात, त्यांच्या नोकरीत स्थैर्य नसते आणि त्यांना अनेकवेळा शोषणाला सामोरे जावे लागते, या प्रबंधात अशा कामगांराच्या शोषणांची कारणे व त्यांचे परिणाम अभ्यासले आहेत.

**अभ्यासाची उद्दिष्टेः**

१) कंत्राटी कामगारांची आर्थिक व सामाजिक स्थिती जाणून घेणे.

२) त्यांच्यावरील शोषणाचे प्रकार समजुन घेणे.

**संशोधन पध्दतीः**

सदर संशोधन लेख लिहण्यासाठी प्राथमिक व द्वितीय माहितीचा वापर करण्यात आला आहे. द्वितीय माहिती प्राप्त करण्यासाठी विविध अहवाल संशोधन लेख, विविध संदर्भग्रंथ, मासिके व संकेत स्थळाचा वापर करणयात आला आहे. तर प्राथमिक माहिती मिळवण्यासाठी कंत्राटी कर्मचा-यांची सोयीस्कर नमूना निवड पध्दतीचा वापर करुन प्रत्येकी एक कंत्राटी कामगारांची माहिती प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती केली आहे तसेच संकलीत माहितीवर प्रक्रिया करण्यासाठी टक्केवारी या सांख्यिकी सांधनाचा वापर करण्यात आला आहे.

**कंत्राटी कामगारांचे शोषणाची कारणे**.

१) कायदेशीर असुरक्षितताः

Anusandhanvallari
Vol 2024, No.1
December 2024
ISSN 2229-3388

कंत्राटी कामगार हे अनेकदा औपचारिक कायदेशीर रक्षणाच्या बाहेर असतात. त्यांना कुठलाही कायमस्वरूपी करार नसतो.

२) अल्पशिक्षण व जागरूकतेचा अभावः

अनेक कंत्राटी कामगार शिक्षणाने मागे असतात त्यांना स्वतःच्या अधिकारांची माहीती नसते.

३) मालकांची लाभाची वृत्तीः

ठेकेदार व मालक कामाचा जास्त फायदा होण्यासाठी मजुरांना कमी वेतन, अधिक तास काम आणि कोणतीही सुविधा न देता शोषण करतात.

४) सरकारी यंत्रणेचा अभाव किंवा दुर्लक्षः

शासकीय पातळीवर निरिक्षण यत्रणां कमी असते त्यामुळे शोषण होऊनही कोणी आवाज उठवत नाही.

५) रोजगारावर अस्थिरता व भीतीः

कंत्राटी कामगारांना कायम नोकरी नसल्यामुळे नोकरी जाण्याच्या भीतीने ते अन्याय सहन करतात.

**कंत्राटी कामगाराच्या शोषणाचे परिणामः**

१) आर्थिक अस्थिरताः

कंत्राटी पध्दतीमुळे नियमीत उत्पन्न नसते. त्यामुळे गरिबी व कर्जबाजारीपणी वाढतो.

२) मानसिक तणाव व असुरक्षितताः

नोकरीवरील अस्थिरता आणि शोषणामुळे मानसिक आजार,नैराश्य व आत्महत्यांचे प्रमाण वाढते.

३) आरोग्यावर परिणामः

कामाच्या अनियमित वेळा पुरेशा विश्रांतीचा अभाव, अपुरी आरोग्यसुविधा यामुळे शारीरीक आरोग्यावर परिणाम होतो.

४) कौटुंबिक जीवनावर परिणामः

कमी उत्पन्नामुळे मुलांचे शिक्षण,आरोग्य आणि संपुर्ण कुटूंबाचे जीवनमान खालावते.

५) समाजात विषमता वाढतेः

कंत्राटी कामगार आणि स्थायी कामगारांमध्ये असमानता निर्माण होते, त्यामुळे सामाजिक तणाव वाढतो.

**उपाययोजना**

१) कंत्राटी कामगारांसाठी स्वतंत्र कायदेशीर सरक्षण व अमलबजावणी.

२) कामगारांना त्यांचे हक्क व कायदे याची माहिती देण्यासाठी जनजागृती.

३) शासकीय तपासणी यंत्रणा प्रभावी करणे.

४) किमान वेतन आरोग्य व सामाजिक सुरक्षा योजना सर्व कामगारांसाठी लागू करणे.

**निष्कर्षः**

शहरी भागातील कंत्राटी कामगार हे आधुनिक भारताच्या विकासातील महत्वाचे घटक असले तरी त्यांच्या कार्यस्थितीबाबत उदासीनता दिसुन येते. त्यांच्या शोषणाची कारणे सामाजिक, शैक्षणिक आणि व्यवस्थात्मक आहेत. त्यांचे शोषण थाबंवण्यासाठी केवळ कायदे असुन चालत नाही, तर अमलबजावणीही प्रभावी असावी लागते.

**संदर्भ ग्रंथसूची**

१) पाटील, शंकर. कामगार चळवळ आणि शोषण.पुणेः शत्यशोधक प्रकाशन.२०१८.

२) देशमुख, अरुण. भारतातील कामगार कायदे.मुंबईःयशोदा प्रकाशन,२०१६.

३) गोखले, माधव. श्रमिकांची स्थिती व संघटना. नागपूरः श्रमिक साहित्य मंडळ,२०१५.

४) महाराष्ट्र शाषन. कंत्राटी कामगार कायदे व कल्याण विभाग,२०२१.